# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 19 May 2024

## Time: 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १९ मे २०२४ दुपारी १.०० वा.**

****

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, निवडणूक आयोगानं विविध ठिकाणांहून एकूण आठ हजार ८८९ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यामध्ये चार हजार कोटी रुपयांच्या अमली पदार्थांसह मनोविकारावरील औषधी पदार्थांचा समावेश आहे. मुंबई उत्तर-पूर्व लोकसभा मतदारसंघात एकूण सहा लाख ७३ हजार ९२५ रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी ५५ गुन्हे दाखल झाले असून, ५६ जणांना अटक करण्यात आल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

नाशिक आणि दिंडोरी लोकसभा मतदारसंघांत एकूण सात हजार मतदान यंत्रांचं वाटप करण्यात येत आहे. जिल्ह्यात चार हजार मतदान केंद्रं असून, या ठिकाणी चार हजारांवर अधिकारी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

धुळे लोकसभा मतदारसंघात एकूण एक हजार ७०४ मतदान केंद्रं उभारण्यात आली आहेत. उद्या होणाऱ्या मतदान प्रक्रियेसाठी जवळपास साडे आठ हजार कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

****

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रतापराव भोसले यांचं सातारा जिल्ह्यात भुईंज इथं आज पहाटे वृद्धापकाळानं निधन झालं. ते नव्वद वर्षांचे होते. भुईंज गावचे सरपंच म्हणून राजकीय कारकिर्दीला सुरुवात करणाऱ्या भोसले यांनी चार वेळा आमदार म्हणून वाई-खंडाळा विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करताना कॅबिनेट मंत्री म्हणून यशस्वी काम केलं. सातारा लोकसभा मतदारसंघातून तीन वेळा संसदेत खासदार

म्हणून, तसंच विविध राष्ट्रीय समित्यांवर काम केलं. त्यांच्या पार्थिवावर आज दुपारी भुईंज इथं अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी भोसले यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

****

नंदुरबार जिल्ह्यातल्या तोरणमाळ परिक्षेत्रात लाकडाची तस्करी करणाऱ्यांवर वन विभागाच्या पथकानं कारवाई केली आहे. या कारवाईत सुमारे अकरा लाख रुपयांचं सागवानी लाकूड जप्त करण्यात आलं आहे. जंगलातून लाकडं तोडून तस्करांनी तोरणमाळ परिक्षेत्रात कोटबांधणी परिसरातल्या जमिनीत पुरून ठेवली होती, असं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

नंदुरबार जिल्ह्यात दोन दिवसांपूर्वी झालेल्या अवकाळी पावसाच्या नुकसानाची, राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावीत यांनी पाहणी केली. या सर्व नुकसानाचे दोन दिवसांत पंचनामे करुन शेतकऱ्यांना सर्वोतोपरी मदत दिली जाईल, असं गावीत यांनी यावेळी सांगितलं. या पावसामुळे शहादा तालुक्यात जवळपास १३ गावं आणि नंदुरबार तालुक्यातल्या सहा गावातल्या शेतपिकांचं, घरांचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे.

****

सांस्कृतिक कलादर्पण मुंबईतर्फे, यंदाचा नाट्यसेवा गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगरमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागातले निवृत्त प्राध्यापक डॉ. जयंत शेवतेकर यांना हा पुरस्कार देण्यात येणार आहे. मुंबईत भायखळा इथल्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नाट्यगृहात येत्या २३ मे रोजी हा पुरस्कार त्यांना प्रदान केला जाईल.

****

छत्रपती संभाजीनगरच्या मीरा प्रभाकर पांडे स्पोर्टस् पार्कच्या वतीनं दिला जाणारा, क्रीडा पितामह पुरस्कार-२०२४ यंदा, मराठवाड्यातील मॅरेथॉन रनर्सचे प्रणेते, धावपटू आणि ज्येष्ठ बालशल्यचिकित्सक डॉक्टर विवेक घारपुरे यांना जाहीर झाला आहे. हिमायतबाग परिसरातल्या एमपीपी फार्म इथं आज संध्याकाळी आयोजित

कार्यक्रमात पोलिस उपायुक्त नितीन बगाटे यांच्या हस्ते डॉक्टर घारपुरे यांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. या पुरस्काराचं यंदाचं हे दुसरं वर्ष आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं आज कवी सुनील उबाळे लिखित `उलट्या कडीचं घर` या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. मराठवाडा साहित्य परिषदेच्या नांदापूरकर सभागृहात संध्याकाळी साडे पाच वाजता हा कार्यक्रम होईल.

****

इंडियन प्रीमियर लीग –आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज दोन सामने खेळवले जातील. पहिला सामना पंजाब किंग्ज आणि सन रायझर्स हैदराबाद यांच्यात दुपारी साडे तीन वाजता खेळवला जाईल. हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय क्रीडासंकुलात हा सामना होईल. तर दुसरा सामना गुवाहाटी इथं कोलकाता नाइट रायडर्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात संध्याकाळी साडे सात वाजता खेळवला जाईल.

****

अंदमान–निकोबारसह मालदीव आणि बंगालच्या उपसागराच्या काही भागात आज मान्सूनपूर्व पाऊस दाखल झाला आहे. केरळच्या अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसामुळे पर्यटन थांबवण्यात आलं आहे. दक्षिण कोकण, मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात आज तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

****